…य काव्य
…क्र. २१२४

REFBK-0018854
REFBK-0018854

# निस्संदर्भ

चंद्रकान्त पाटील

२१२४ काव्य
संदर्भ
८०७८६
१२/१०/०३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ........................ वि: ........
क्रमांक ........................ नों: दि: ........

१८८५४
शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0018854
REFBK-0018854

# निस्संदर्भ

## चंद्रकान्त पाटील यांच्या तीस कविता

संपादक
रवींद्र किम्बहुने

वाचा प्रकाशन : १२
निस्संदर्भ : चंद्रकान्त पाटील
सर्व हक्क संपादक रवींद्र किम्बहुनें, नांदेड यांचे स्वाधीन
पहिली आवृत्ती : १५ ऑगस्ट १९७३; प्रती ५००
किंमत ५ रुपये
मुखपृष्ठ : उत्तम क्षीरसागर
प्रकाशक : सतीश काळसेकर, C/o प्रकाश देशपांडे, ३७ नूतन कॉलनी, औरंगाबाद
मुद्रक : प्रल्हाद साहनी, प्रगति मुद्रणालय, लक्ष्मी टॉकीजजवळ, नांदेड

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८८५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम C0.66६ वि: काव्य
क्रमांक २१२४ नोंद दि. १२/१०/

१

ओहोटीचा सागर किनारा
पाने गाळून उदास झाडांच्या ओळी
धुके माळणारे आकाश
–आणि माझ्यात सामावणारा शिशिर
अर्ध्या बहरानंतर !

●

२

ते पेटून पुरे लपेटून, उरी विद्युल्ल संवाहन
जैसी छिन्निच पत्थरास कधि दे आवेगुनी चुंबन
ओठांच्या लयविभ्रमात हलकेसे लाघवी आर्जव
जैसा की अरुवार अभ्रगतिचा आभास हो केवळ

तू संध्या हिमसर्द, अर्धमिटल्या नेत्रात आरेखन
तू चंद्रोज्ज्वल मोहविद्ध रजनी, तू स्वप्न-आवाहन
ओली कातरधून तूच अन् ते वारे अधोर्वातित
माझ्या प्राणमयी दिठीत पहिले सारे क्षण स्वार्तिद

तू नाहीस तरी तुझी गहनशी छायाच आंदोलते
माझ्या या पलकात का ? रुधिर का पेटून थंडावते ?
का काळोख सुदीर्घ क्षीण दुखऱ्या गात्रातुनी वाहतो ?
का प्राणातुन खोल खोल गहिरा मृत्यूच हेलावतो ?

माझे श्वास विलीनतात सरता या चंद्रगामी खुणा
रात्रीच्या, विझती तमात असल्या अंगारसंवेदना.

●

३

शुभ्र तेजस देहरेषा
तांबड्या ओठात राघू, गूढ भाषा
चिन्हदाने पावलांची भोवताली
सुस्तनीच्या या मदालस हालचाली
सांडले आभाळ नेत्री दीनवाणे
चंद्र येतो गावया अंधारगाणे.

ही प्रिया शृंगारगाथा
चंद्र माझा सोयरा अन् स्वप्नदाता
चंद्र केव्हा वेदनेला जाग देतो
सावल्यांच्या शिंपल्यांनी आग देतो
पेटताना मी तिला शोधीत जाणे
चंद्र तेव्हा गातसे अंधार गाणे.

४

नभ उतरू आलेले जलात, तरंगसंग
काठाकाठाशी पॉप्लर पितात पिवळा रंग
रांगा सुदूर अस्पष्ट गिरीच्या हिमसरशा
हिरव्यावरती चौकोन  कोरती कौलारू रेषा

आणि एखाद्या ओलस वाटेचे नवखेपण
एखाद्या पक्ष्याचे पंख झेलती सोनेरी ऊन्ह
एखादी होडीच पाणी कापते अधूनमधून
एखादे मनच चिंब एकान्तात भिजून

एक सावळी सांज आणखी काळोख फिका
गळून पडल्या पानाच्या घायळ गिरकीसारखा !

●

गच्च खिडकीत रुतून बसलेला उन्हाळा या अवेळी
किंवा माझ्याच डोळ्यांत, बाहेर उडून गेलेल्या
अफाट माळावर विस्तारत जाणारी पोरकी भग्नता
उन्हे उदासीन; क्वचितच जखमा सावल्यांनी केलेल्या
उन्हावर; अनावर एकल्या वाटेचे हरवून जाणे
स्वच्छ क्षितिजात आणि कडेच्या झाडांच्या रांगांत
झाडे : रेषाच कोवळ्या पानाच्या भडक फुलातून
भडकते उन्ह गच्च खिडकीत बसलेले रुतून !

स्तब्ध घरांच्या तिष्ठणाऱ्या भिंती, भिंतीवरील
चित्रांच्या रेषांगत; मात्र मधेच वाहणारा वारा
अभिजात चित्रातील भासमान हालत्या रेषाच जशा
मधेच झाडाचा रंग ओरबाडून दूर उडून गेलेल्या राघूच्या
कर्कश्श कर्कश्श आवाजाने जाते एकांत-काच फुटून खळकन्
एकान्त ······ नंतर घरात, वाऱ्यात, झाडात
आणि माझ्याही मनात उतरणारा, उन्हाळ्याचा, उन्हाचा

असह्य क्षण; असहाय्य मन; तरीही झिंगून टाकते संध्याकाळ
उन्हाळ्यातील; डोळे उगाचच भरून येतात, रिकामे होतात
प्रत्येक आसवांत निदान एखादी आठवण असते
हळुवार भरून ठेवलेली तिच्या ओठानी, डोळ्यात . . .
कसे मोजावे पाण्याहूनही तिचे हिमशुभ्र अमलीन मन,
पळसपाकळ्याहून निदारक्त ओठ, उत्तुंग हृदय देवदाराहून
इथे नि तिथे . . . गात्रातून बंदिस्त असंयमी क्षण . . . तिथेच
साऱ्यावर पसरत जाणारा उन्हाळ्यातील निर्दयी एकान्त !

फक्त एकान्त . . . समोर भंपक कविता मित्रांच्या
समकालिनांच्या, अनोख्या कवींच्या, किंवा माझ्याच,
माझ्याच मेलेल्या क्षणांचे बेईमान अनुप्रास उध्वस्त
कित्येक जाणिवांचा हातून नकळत झालेला अस्त . . .
फक्त एकांत . . . माझ्यासारखेच दिशाहीन आकाश, नितळ अवकाश
एकही ओलेता ढग दिसत नाही खिडकीतून डोळ्यांना
माझी दृष्टीच उडून जाताहे रिकाम्या शून्यांत
जशी उन्हे बुडून गेलेली बिंदुसरेच्या कोरड्या पात्रांत !

●

## ६

भणंगभटकत्या ताऱ्यासारखा दिशाहीन मी
माझा बाप सोडून गेल्यावर मला, आम्हाला
एक जन्म : एक प्रायश्चित त्याच्या अपघाताचे
अशा कित्येक अपघाताची चक्रे पाहिलीत त्याने
त्याच्या पायावर नक्षत्र होते आणि हातात भिक्षापात्र
मोडला नाही मरणापर्यन्त किंवा नंतरही
वाकला मात्र प्रत्येक कोवळ्या कोरड्या वाऱ्यापुढे
अदबीने लाचारीने आणि नंतर सवयीने
कुणीच थांबले नाही त्याच्या रक्ताचा प्रवाह थांबेतो
—सावलीही गेलेली होती सोबत टाळून, कंटाळून

मी घसरत गेलो त्याच्या वाटेवरुन सपाट आपोआप
परंपरागत भिक्षापात्र माझ्याकडे चालून आले
आणि कित्येक हेमन्तात झोकून दिलेला
त्याचा फाटका कोट लचकावला टरकावला कुत्र्याने
त्याच्याजवळ एवढेच होते; शिवाय आसवं
– ती मात्र कधीच कुणीच घेतली नाहीत

त्याच्या सरणाच्या ज्वाला भडकल्या मस्तकात
माझ्या आणि विखुरल्या आकाशभर अस्ताव्यस्त
मी मस्त ओठ बुडवून ओंजळभर मद्यात
वाजवलीत हातात तांब्याची दोनचार खुळखुळनाणी
गाइलीत गाणी आणि भटकलो अनवाणी होऊन
भणंगभटकत्या वाऱ्यासारखी भिरभिर दिशाहीन

कसे म्हणू जवळ नाही आज त्याची एकही आठवण
हे हातावरील रेषांचे जाळे आणि हे चाळे
हे त्याच्याच कर्तरी प्रयोगाचे कर्म भोगतांना?

●

७

ही यौवन दाहकता, गुल्मोहर
हे चंचलचोचलेपण, गाडीच्या धुराळ्यासारखे
गर्भार बाभुळ असते तेवढेच सत्य, मातृत्वशील
गरवारे नॉयलॉन्सच्या धाग्यासारखे आयुष्य लवचिक,
लांबलचक; गाडी गतिमंद
ढगांनी गिळून उध्वस्त केलेला सूर्य
तटबंदी कांच, खिडकीच कांचेवर
रेलणारा धूर, गॉगल, फिल्टरकूल
उष्माघाताने कुणीही मरते झोपेत
परीच्या स्वप्नातला राक्षस, हाताच्या
घडीची चोरलचुंबने घ्यावीत हरघडी केसांनी
पेटणे स्वस्त, कुठेही, कशानेही हज्जारदा
पण ते चंचलचोचेपण; ही प्रवासी नशा

●

## ८

काळोख कोसळत्या क्षणांचा आधार
झाडांना, या गौरकाय रस्त्यांना
कित्येक चुणचुण चिटचिट पावलांना,
मी पाहिलाय पदर बुडताना काळोखांत
आणि कित्येक विचार आणि एक गतिमानता
स्वस्थ पाऊले, उंच टाचा, टंच
काचोळी, काच, चोळी, आरसे अंगांगावर
कसे कसे आणि किती ससे डोळ्यातले ?
मी पाहिल्येय पत्थरसामर्थ्यं तिचे,
तिला परकराशिवाय आणि परकर तिचा
फुगलेला तिच्याएवढा, हवेत . . . निष्पाप
मी तिलाही पाहिलेय, नंतर एकाकी
एक काळोख साकळत्या कोपऱ्यात
आणि काळोख गिळताना सुद्धा....आत्मरत

●

९

मी कोडायच्या हिवाळ्यात शाखांना बिलगलेले ढग पाहिलेत
आंधळ्या पहाटे फुलांचे अभिसार पाहिलेत
मी पाहिलीय् पावसानंतरची थरथरचुंबने थेंबांची तारेवर
अल्गद उतरणारी समागमोत्सुक संध्याकाळ
उन्हाळ्यातील पहाडावर

मला आता आयुष्यात
मनाजवळ वावरलेल्या कित्येक कित्येक पोरी आठवतात

मी हे सरळच सांगून ठेवतो की मी अस्पर्श
हरवलो नाही कधीच कुणाच्या स्पर्शाच्या जंगलात
ओठांवरच्या लालस लवलवीने ऊब दिली नाही
भिजलो नाही चोरट्या संभोगक्षणांच्या पावसात.

•

१०

मीला दिसते एक न भोगलेली संध्याकाळ हिवाळ्यातील नैनीतालची
न भोगलेली एक उबदार पोरगी किंचत् तिरकस डोळ्यांची
न धरलेला कवेत तिच्याहून उत्तुंग एक चिनार, एक सिडार
खोलीत न मावणारे धुके न घुसलेला पूर्वी कधीच गारठा गात्रात

मीला दिसते अस्तित्व संयमाचे पृथ्वीहून विशाल, नसलेले

मीला दिसतात प्लीजचे हिमखंड कोसळताना अंगावर
घोंघावताना प्लीजची चक्रीवादळे आसमन्तात
मीला दिसतात त्याहून विशाल तिचे स्तन
त्याहून अफ्फाट प्रचंड व्यासांचे तिचे नितम्ब
आभाळाहून औरसचौरस नीलम् नीलम्

मीला दिसतात कातळातून वारे कापत
वर येणारे फक्त प्लीज प्लीऽजचे थवे

मीला दिसतात फक्त दिसतात कधीच ऐकू नसतात.

●

या ऽ
तुझे खरे नांव कुणी ठेवले
त्यांची फुलपांखरे होतील नंतरच्या जन्मांत

●

वक्षाहून डौलदार क्ष हे अक्षर, त्यांत
या ऽ
तुझे कोमलराकटपण नाही

●

या ऽ
तुझ्या पापण्या किती
किती संध्याकाळीत तू विरघळली असशील
किती ढगात तुझे रंग
पाण्यावर शहारे किती
किती फुले तुझ्या समोरच्या झाडावर
या ऽ
किती कितीत तू आणिक किती

●

तुझी चाल
या ऽ
चालताना ढवळून निघतात आमच्या दिवसरात्री

•

या ऽ
गंधार कळत नाही, तशी तूं
अंधार तरी अजून कुठे पुरेसा कळालाय
या ऽ
ओठाडोळच्यांना पेलवत नाही अंधारगंधार

•

या ऽ
तू घसरशील तिथे झुकतील धुक्याचे पर्वत
बर्फाचे जंगल
बर्फ भरुन घे गात्रांत
तू सं-दग्ध कुणासाठी
•

या ऽ
ये
स्वरांना अंग देऊन झुलत रहा
स्वरांगदा हो

●

या ऽ
ये
पाने खा
गाणे पी
भुर्र उडून जा
माझ्या झाडावर भित्री चिमणी
चिवचिव नाही

●

या ऽ
ये ऽ येकदाच
नंतर मी मरणसरण माझ्यासाठी
तुझा जन्म तुझा जन्म
अंगण बदलून फुलत रहा

●

१२

हे शाप दिलेत ज्यांनी त्या सगळ्याच रात्री तुझ्या तुला वश झालेल्या
थांबल्या नाहीत कधीच डोळ्यांपाशी. स्वप्नाचे किनारे चाळवलेत त्यांनी.
डोळे थकून थकून गेले तरी डोळ्यांना वाटा फुटत नाहीत;
मी वाटांना गोंजारणार नाही. त्यांनी मला भ्रमंतीच दिली.

या वाटांना दिशा नाहीत आणि तुझ्या घराला उंबरठे.
तुला मन नाही फक्त बेदरकार देह आणि अनोखाच रंग.
तूही नाहीस कदाचित. आयुष्य विस्कटून टाकण्याएवढे अस्तित्वही नाही.
नसशील तर तेवढ्या शब्दांना वाटा दे डोळ्यांच्या आभाळातून.

वाळवंटाएवढे लांबलचक आयुष्य; न संपणारे वाळूचे दिवस
पण किती थोडेपण तुझ्यासह, किती हातात येणाऱ्या घटका.
आपण अस्पर्श राहिलोत तरी दृष्टीचा समागमही पुरेसा होता हे
कळलेच नाही; आणि नंतर माझ्या मॅनियाला पिले झाली
एक तुझ्यासाठी; एक न सोसता येणाऱ्या कोळसत्या जगासाठी;
तुझ्यावर कोसळत नसेल यावेळी हे अजस्त्र एकटेपण,
मी रात्रीच्या लाटा थोपवून शब्द विझवतोय कागदांवर तुझ्यासाठी.

●

१३

मी पाहतोय मला; अमूर्ताच्या हाका येताहेत विलक्षण जगातून,
जिथे प्रकाश तांबुस तांबुस फिकट फिकट अरुप काळोख.
जिथे चंद्र विस्कटलेले, रंगित रंगित ओलस ओलस.
जिथे झाडे अनाकार; अनाकारच सगळ्या सावल्या.
अमित वस्तू. त्यांचे स्पर्श अफाट, बोलके आकाराहून
आणि जिथे आकाशात नसतात दिशा
तिथूनच ओघळतात अधूनमधून
निस्संदर्भ कवितांच्या फुलपंखी ओळी
मी पाहतो तिथेच. ऐकतो
संगीतावरुन संथ सरकत येणाऱ्या अलवार मृत्यूचे आवाज
जसे हालते हिंदोळते ढग पाण्यावर विश्रब्ध तळ्याच्या.

●

मी मृत्युच्या साम्राज्यात पाहीन माझी प्राणातीत प्रेयसी.
तिच्या गळ्यातून ओघळत असतील सान्तात
संगीताचे विश्वगंभीर आरोह अवरोह; आणिक
सोबतीला बहरलेल्या काळ्या गुलाबांची सळसळ.
मंद हालचालींनी आंदोलित होतील तिच्या स्वरांची कंपने.
आणिक मी तिचे मृत्युमयी नितळ ओठ
प्रदीर्घ प्रदीर्घ चुंबीन; तेव्हा माझ्याही देहात
खळाळेल मृत्यूचे संगीत. गात्रात नाजुक आंदोलने उठतील
तेव्हां क्षणभरच; फक्त क्षणभरच
थांबेल बहरलेल्या काळ्या गुलाबांची सळसळ
तिच्यासाठी, तिच्या प्रदीर्घ नितळ ओठांसाठी.

मी सांगतो की आजपासून हजार वर्षांनी मी
असेन बहरलेल्या काळ्या गुलाबांच्या प्रदेशांत.
तिथल्या सावळ्या धुक्यांत अस्पष्ट दिसेल माझी प्रेयसी.
आणिक तिथल्या मरणमयी काळोखात मी पाहीन
माझ्या कधीच न जन्मलेल्या कवितांच्या शब्दहीन ओळी.

हे सार्वभौम मृत्यो ! आमच्या संवेदना तुला आवाहन करीत आहेत
ये, हे सार्वभौम मृत्यो ! आमच्या प्राणात भर चिरंतन काळोख.

●

घरात भयंकर धूळ आणिक थोटकं सिगारेटची
प्यायला काहीच नाहीय नुस्त्या रिकाम्या बाटल्या
आणिक पोट तर दुखू लागलय भयंकर कसं तरी
औषध फुटून फरशीनं पिऊन टाकलं सकाळीच
पेप्टिक अल्सरच्या बाहुपाशात बघताना स्वप्न भयंकर

आठवतय समोर सबंध खरोखर उभारुन थांबवून
भळ्भळ्ली संध्याकाळी रस्त्यावर जुनीच ओळखीची जखम

नेमका तेव्हाच पाठीच्या कण्यालगत सरकून
डाव्या कमरेला वळसा घालत थेट पोटावरुन
उजव्या बरगडीच्या काठावर पीत होता ढेकूण आपल्याला
आपण म्हणालोत की ओक्के बरय् जा मग

होतय असं की बरबादी येत्येय हातापायातून तोंडातून खिशातून
घुसत्येय डोक्यात ग्रहांनी सांडलय विलक्षण वादळ वक्री होऊन
आतून उमळतय सॅडिस्टिक फूल विकळतय मनच
आणि इतके दिवस वाटत राह्यचं आपलंच तर त्या
मरणानंसुद्धा दुसरा शेजार केलाय घर बदलून आपला घरोबा सोडून.

## १६

जगण्याअगोदरचं आदिम एकटेपण पाठीशी घेऊन
छाया, मी आलोय
आणि अचानक उगवलोय या वास्तूत अचानक तुझ्यासमोर
आणि डोळ्यांपाशी काहीच टिकत नाहीय क्षणभरसुद्धा
आणि या तमाम मुम्बैचं धुकं होऊन जातय क्षणात
आणि तुझे मायावी मुखवटे गळतायत सगळीकडून
घराघरातून गर्दीतून वाहत येतायत सावकाश
आणि अनोळखी रस्ते सामोरे होतायत हज्जार
आणि गोंधळून थांबतायत इथल्या पायऱ्यांजवळ

छाया मी आलोय
डोळे उघड की सगळं सहज आहे नेहमीसारखंच
घरंदाज दुपार, टेबल, वेटर, गोंधळ, कल्लोळ नेहमीसारखाच
आणि कॉफीवर वाफा घुमटतायत नेहमीसारख्याच
आणि रेडियोतून गाणं निसटतय नेहमीसारखच
आणि ओठांवर शब्द मिटतायत नेहमीसारखेच
आणि माझ्यातून फुटून निघतोय मी नेहमीसारखाच
कळत नाहीय, अवसान जमतय की विरघळून जातय्
द्वंद्व कोसळतय सगळीकडून की उधळल्या जातंय

छाया, मी आलोय
असण्यातून अपार होऊन, नसण्यानं नासून नासून विस्कटून.
छाया मी आलोय.

●

पंचवीस वर्षांच्या लाटांवर तरंगली कवितांची प्रेतं
रिकामेपणाचे सांगाडे, मनमोने पंछी, पिसं इथंतिथं
एवढंच. काही नव्हतंच. नव्हताच किनारा तुझ्याशिवाय
विरणं कबूल नव्हतं की फिरणं परत, नुस्तं लाटांवर गरगरत राहणं

पंचवीस वर्षांच्या लाटा पाह्यल्यावत्या डोळे पाण्यात सोडून
तर पाणी जसंतसंच, जिथंतिथंच, पायघोळ, पायाजवळ
डोळे लुटून नेल्ते पाण्यानं, हात खुडून नेल्ते, पाय रुतून गेल्ते
सरकत नव्हताच किनारा, नुस्ता आभाळदूर

पंचवीस वर्षांच्या लाटा थडकतील तुझ्याही कमरेवर
डोळ्यात काळोखा सावन, काळीज आभाळभर
उदासीन, आतून कातरती धून
दरियादिरंगाईची, सावल्याबावल्याची संध्याकाळ पांघरुन
येशील तेव्हाही आत्तासारखीच तर काही नसेल
तीच कवितांची प्रेत इथंतिथं, हातात न येणारा बरबादीचा फेस
डोळे मिटून जातील, हात उडून जातील, पाय फितूर होतील

येऊ नकोस
की मी अचानक् फेकला जातोय एका अनोळखी निर्मल किनाऱ्यावर.

•

१८

माझ्या हातावर एकूण एकशेएक्कावन्न रेषा
तीन चक्र आणि सात शंख मंगळ दशमात आहे
मी विस्कळित झाल्यावर मरेन मी काल
सकाळच्या पहिल्या श्वासाने मृत्यू हुंगला
आत्ता माझ्या सगळ्या स्नायूंना छेदून
अस्वस्थता बाहेर येईल माझ्या छातीत
मावत नाही ती मला गच्च धरून ठेवा

माझे आम मज्जातंतू सडत आहेत आत्ता त्यांचे
विघटन होऊन एक पांढरा पदार्थ ब्रेन–कॅव्हिटीत
तरंगेल तो मी झुरळात पाह्यला होता आणि बेडकात

बाळचा म्हणतो: धरा याचे साय्कोअनॅलिसिस् करा
मी म्हणतो कविता म्हंजे घटना किंवा माझ्या
सडणाऱ्या मेंदूचे विघटन इत्यादी .......

●

१९

एक पिवळी पोरगी दिसली त्याच्या डोळयांना
रस्त्यावरुन घरंगळत चालताना पिवळीकेशरी संध्याकाळ
पिवळी उन्हं, पिवळया भिंतींची घरं, पानं पिवळीकोमल
त्या पोरीचे डोळे पिवळें, पिवळी कडा ब्लाउझची, डोळयांखालची
वर्तुळं पिवळी त्यानं टिपलेलं तिचं दुःखही पिवळं फिक्कट
ती एका पिवळयाजर्द फोडाएवढी त्याच्यासाठी, त्यानं
अस्वस्थ वाटून घेतलं भयंकर तिच्या अनोळखी पिवळेपणानं

मग चालताना दोन्ही खिशात दोन्ही हात घालून सरळताठ
थांबल्यावर नाकाडोळ्यांवर गांभीर्य ओढवून घेतलं
आवाजाची बदलपट्टी बरोबर पकडून म्हणाला तो :
"चंदोबा, आम्ही एका संक्रमण–अवस्थेतून करीत आहोत भ्रमण
सबंध राष्ट्रावर शैथिल्याचे ढग दाटून आलेत आणिक
आमच्या अस्मितेला दुभंग जाऊन देखील आम्हाला जाग येत नाहीय
हे दुर्दैव. चंदोबा, बघ ती पिवळी पडलेली पोरगी, ज्या
वयात तारुण्य उपभोगायचं खचून गेलीय निराशेनं, ती
एक अविभाज्य घटक माझ्या राष्ट्राचा, अरे यातना
होतात हे पाहून, गर्गरते डोके, विवेक स्थिरावतो इत्यादी इत्यादी
जय हिंदुराष्ट्रा तुला सहस्र प्रणिपात, आमच्या धमन्यातून
रक्त वाहू दे खळाळून तुला समृद्ध करण्यासाठी........"

त्याच्या डोळ्यांनी पाह्यलं सबंध भरतखंड पिवळं झालेलं
म्हणून घाबरलो आम्ही आणिक पुढं घालून नेलं डिस्पेन्सरीत
एका बुद्धिवादी डॉक्टरच्या तर डॉक्टरांनी धीमेपणानं
हात न लावताच सुरु केला त्याच्यावर मानसिक इलाज
त्याला हिंदुत्वाची काविळ झालेली हे ओळखून झाल्यावर.

●

टेस्टटचुबातल्या रसायनांचे रंग तिच्या स्वप्नांना
बोटावर नखांवर रसायनाचे पंछी, तीनेक साडीच्या समोरच्या पदरावर
एखाद्या गर्भार पेंग्विनसारखी चालत गेल्यावर
ठिपके बहाद्दर फरशीच्या चौकोनानी तिची पावलं मोजली असतील

ती खुर्चीजवळ थांबली आणिक डिस्टिल्ड वॉटरच्या गोलावर
टेकवले गाल
मागाहून आलेल्या प्रश्नासाठी निर्जिव ओठ हलवले : होक्का
नंतर थरारली काचपात्रं, टेस्टटयूब्ज, खिडकीच्या काचा, गज,
पंखे छतावरचे
आणिक इतरही सिम्पॅथेटिक व्हायब्रेशन्सनं अकस्मिक हसण्याच्या
( सांळुंक्यासुद्धा पडल्या असतील या विलक्षण धक्क्यानं )
मग ती हळुवार हळुवार मंदावत गेली आणिक भिरभिरतं पाहून
आस्ते आस्ते होकायंत्राची दिशा बदलवून टाकली तिनं
तिच्या हालचाली मंथर झाल्या, डोळ्यातल्या बाहुल्या,
स्वप्नांची सरमिसळ
मेंदूतले उद्रेक मंथर : संध्याकाळची हवा, मॅटिनी, कोजिक
ॲसिड, नवकथा, गुरुमंगळ

मग उन्हं वाढत गेली तशी जाणवलं तिला तिचं वाढतं वय
मलूल झाली ती, भुवयांचे किनारे थकून गेले आणि
मान टाकून तिनं आरपार पाहचलं सिंहस्थामधून.

शाखा (स्थळ प्रत)

२१

मग भेदरून खिडकीच्या फटीतून फेकलेत डोळे
विधवा रस्ते Coma त भिंती प्रेतं गेल्यानंतरची सामसूम
दरवाजे बंद खिडक्या बंद
कोचावर पडलो वैतागून तर सगळं रिकामं रिकामं
हलकं किंवा जड किंवा कसंही किंवा कसंतरीच
गाण्यांचे गळे घोटून टाकले तरी आठवलेत
सगळ्या पोरी आठवून झाल्यात सगळ्या कादंबऱ्या
सार्वजनिक वासनालयं अगेहानंद भगवा झगा
व्हासॅम्टमी सायकिक लोलिता ट्रॉपिक ऑफ कॅप्रिकर्न
पाह्यलं खोलीतलं एकुलतं पोर्टेट वहिदाचं
डोळे ओतून डोळे वहिदाचे घरंदार सोज्वळ झुकलेले
पदर वहिदाचा लालभडक बोटं वहिदाची लांबसडक
हात वहिदाचा अकरा बांगड्यांनी भरलेला उजवा
डाव्या हातावर हनुवटी फुलं अंबाड्यावर
सगळं संपवून झालं तरी आली नाहीत उघडता
दारंखिडक्या तर झाडांच्या फांद्या पाह्यल्या चोरून
Sensuous

बाहेर कर्फ्यूतल्या वांझोटच्या रात्रीचं भयंकर गळालेपण
भयंकर सामसूम.

●

तीन माणसे माहीमच्या रस्त्यावरून
झिंगतझुलत गेली त्यातला एक मला त्याच्याच
स्वप्नात मेलेल्या माणसासारखा वाटला म्हंजे
त्याचे स्वप्न मला पडले ते त्याचे होते किंवा
असे म्हणा की त्या तेवढ्याश्या स्वप्नापुरता मी तो झालो

त्यातला दुसरा माणूस शब्दांना झोंबत होता
रस्त्यावर कालभर कित्येक लाख दिवसांपासून
झोंबतो तो तसाच तर आपण कशाला फेका
त्याच्याकडे प्रश्नांचे गळफास म्हणून लक्ष
न देताच आपण फुडे निघून गेलो कारण
त्याच्याहून ज्यास्त त्याचे प्रदर्शनवादी शब्द आणिक
जगातलेही एकूणच शब्द आपल्याला म्यूझिअमधल्या
भुस्सा भरलेल्या तास पक्ष्यांसारखे वाटतात

तीन माणसे रस्त्यावरुन झिंगतझुलत गेली त्यातला
एक मीच होतो असे मला
दुसऱ्या दोघांनी सांगितले म्हंजे मग
आपण तरी नाही कशाला म्हणा आणिक नाहीत कशावरुन.

●

२३

प्रत्येकाच्या खिश्यात असते तशी व्हिस्की त्याच्याही खिश्यात
पण त्याला पायजेय मोलॅसिस डोळ्यातलं
पायऱ्या चढून गेल्यावर लागतं त्या ठिसूळ बाईच्या
सगळ्याच बायकांच्या डोळ्यांशी झोंबतं काजळ
आणिक ओठांशी तांवडा रंग केसांशी जाळी किंवा वेणी
स्तनांशी चोळी आणिक जांघेशी जांग्या
इथं रस्त्यारस्त्यावर चौपाटीवर क्यूमध्ये
थेटरात लोकलच्या डब्यात घरात बोळातसुद्धा

धुरांच्या वर्तुळासारखे दिवस निघून गेलेत
ते त्याला ढकलता आले नाहीत घश्याखाली
त्याच्याहून थोर त्याची विझलेली सिगारेट

आत्ता ही संध्याकाळ विझत विझत बुडेल
समुद्रात आणि काळोखात ती–
सुद्धा त्याला ढकलता येणार नाही म्हणून
त्यानं स्वताला गहाण टाकलं नेहरूनाण्याच्या
साक्षीनं आणिक अंधाराला यजमान केलं
वाळूवर डुचमळता डुचमळता.

●

२४

तीन घड्याळं सुंदराबाई हॉलमध्ये अडिच दिशांच्यात
आणिक पडदा आणिक स्टेज आणिक खुर्च्या
माइक् माणसं भोंगे असलंच बरंच

माणसं कितीही घुसतात
ज्यांच्यामुळे संपृक्त होत्येय इथली हवा
केलेली बंदिस्त भौमित्तिक भिंतींनी

।। किती मिन्टे म्हंजे तास । किती पावले म्हंजे वाट ।।
।। किती पेशी म्हंजे माणूस । किती पोरी म्हंजे हाट ।।

—एवढं कोष्टक द्यावं ज्यालात्याला
आणिक सांगावं गर्दीचा काळकामवेग काढण्यासाठी

– नंतर येऊ द्या येऊ द्या म्हणून माणसांच्या
लाटा आदळल्या गर्दीवर आणिक आम्ही
कमरेखाली झुलत राहिलोत बराच वेळ
चरकात सापडल्यावर होतील तशी चिपाडं
झाली गर्दीत आमच्या काही फुटांची इंचांची
आमचे प्राणिचैतन्य उफाळून कमरेपर्यंन्त आले त्याचा
वरच्या डोळ्यांशी कानांशी तोंडाशी संबंधच नाहीय
प्रत्येकाला एक नवाच अवयव चिकटला पाठीमागं
ते मागच्याचं लिंग होतं आपल्याला शेपटीसारखं
आमची डोकी मेननभोवती गरगरत राह्यली
इथं आम्ही गर्दीत इथं आदळणाऱ्या
ऑक्सिअॅसिटिलीनच्या ठिणग्या भोंग्यातून
वळलेल्या मुठीतून वेंगालिनकडून :

*मंकीज् आर क्लाइंबिंग द पार्लमंट*

– आमच्याही मागं एक शेपूट आहे आता, पार्लमंट कुठाय् ?

●

प्रारब्धानं फेकलेल्या संध्याकाळी एका चिचोळ्या बोळात
अरुंदाचे जिने चढून गेलोत एका निरुंद खोलीत तर
फक्त पंखाच दिसला हसताना माणसं टेबलं मासिकं
भलतीच स्तब्ध स्वागत शिंपडून आमच्यावर
मग मिन्टं वाढत गेली तश्या खुर्च्याही वाढत गेल्या

एक आश्चर्य: तेलाच्या टाकीसारखी एक बाई नाजुकल्या खुर्चीत
फसफसून हसली त्याहून आश्चर्य तिला बाधा झाली कवितेची
कथेची कादम्बरीची म्हणून ती राधा झाली आणि उरलेल्या खुर्च्यांचे कृष्ण
मी कुठाय् मी कुठाय् म्हणून विचारत चहाच्या कालिंदीत
बुडून गेला एक टायवाला माणूस प्रश्नचिन्हासारखा फक्त–
त्याच्या मिश्यांमध्येच प्रांण उरला होता थोडासा एवढं कळलं

शोकेसमधल्या नव्या पुस्तकाच्या कव्हरासारखी एक पोरगी
आली नंतर, बसली आणिक खोटं खोटं लाजून गेली अकारण
तिची खुर्ची पिसाटासारखी ओरडली असेल की ही पण
तेलाची टाकीच होणार तर ते तिनं ऐकलं नाही सोईस्करपणे

आम्ही जिने उतरलो अपराध्यांसारखे तेव्हाही
डोक्यावर वैतागमिन्टाचा पंखा गरगरत होता म्हणून
आम्ही दंडवत घातलं त्या प्रारब्धाला . . . . .

मग शिवडीचे रूळ ओलांडून दुतर्फा जाऊन
बसलेल्या झोपडयांना आम्ही अशोकचे पत्ते
विचारले तर एका हॉटेलातून गुंगुं करीत
मणभर माश्यांचा थवा वळला उजव्या बाजूला
म्हणून आम्हीही वळलोत तर नेमक्या
उजव्याच बाजूला मुम्बैच्या एका कवीच्या
कवितेतल्या आत्म्याएवढी प्रचंड भयाण
तेलाची टाकी गरगरत गेली आमच्या डोळयांवरून
मागोमाग गळत गळत गेले तेल आणिक डोळे गेले
आणिक भिरभिरणारे आमचे पाय

तो बसतो त्याच्यासमोर किती तरी गोष्टी होत्या
त्या आता आठवून आठवत नाहीत पण एका
काचेच्या दरवाजातून दाखवला त्याने एक
अफ्फाट ढग उडत्या सिमेंटचा त्याचे नाव
त्यांनी अगोदरच दिग्विजय सिमेंट असे
घालून ठेवले होते हेही त्यानेच सांगितले
तो खुर्चीत बसला होता हे चक्क हातांनी पाहिलेय्
आणिक मग त्याचे पोस्टकार्ड वाचले भरभर
तर तो अशोकच निघाला.

●

मग अखेर सरपटत गेला मुम्बैवरून
एकोणिसशे सहासष्टचा डिनोसॉर; धुक्यात
सदुसष्टचे रंग वितळलेले; पाण्यावर
समुद्राच्या सदुसष्टचे शहारे; रात्रीची
मध्यान्ह; रस्ते रस्ते म्हंजे धमाल

तेव्हा झोपेत चक्क एकोणिस डब्यांची रेल्वे
एक सेक्सी पोरगी गळ्यात हात गुंतवून
विनवणी करताना आपण कूस
बदलून स्वागत केले सदुसष्टचे

आणि तशातही ऐकू आलेत चर्चच्या
मनोऱ्यावर घणघणणाऱ्या आपल्या वैफल्यघंटांचे
आवाज, नवे प्राण उसळले नाहीत
पायात दोघांच्या मिळून चार झालेल्या

एकोणिसशे सहासष्टच्या अजस्त्र डिनोसॉरचे
पाय मात्र अगदीच लहान, केविलवाणे !

२८

रात्री सुकून जातात अचानक चंद्र पिवळे पडतात पिवळतात फुलं
पिवळ्या पहाटे पाठवतो व्हायरल हिपॅटायटिसचा पर्मेश्वर
बागडू लोकांचे थवे सहा नंबरच्या आयसोलेशन वॉर्डात
इस्पितळ्यातल्या अंगणात थडथडतो प्रकाश झाडं कोमात
पानं गाळतात किंवा आसू चिमण्या छताशी भिडतात किंवा
छातीशी एकमेकींच्या पिवळेपणा पकडतो डोळे गच्च
पांढऱ्या बेडवर पडून शांत ऐकता येतं अंतर्संगीत
लिव्हरपेशींच्या मोडतोडीचं व्हायरसचा जॅझ किंवा ऱ्होंबासोम्बा
थरथरते हात सिरम बिलिरुबीनची समजूतदार साथ

डोळ्यांना वेळा चिकटत नाहीत कित्येक संध्याकाळी तरंगतात
इस्पितळावर कित्येक डोळ्यांवर उदासीन पिवळेपणा
पसरवीत अमर्याद
नियती गिरगिरत भिडते एक बाई भिडस्त मर्यादा झुगारुन
अव्यक्तात बांधते एक घर वेगळं हिपोक्रेटसच्या नावाचा पूल जोडून
रक्ताची नाती पसरत जातात नकोत त्या शरीरात थांबत नाहीत
पायजेत ती शरीरं हज्जारो मैल दूर राहतात रक्त आटून जातं मधेच
मायावी मनं देतात ओलावे आणि कधीच अपेक्षित नसतो
सापडेल म्हणून धुंडाळत राहचलेला सहारा मनासाठी

कुठं थांबावं सगळ्यांनी सारखंच घेरलेलं गच्चिम
वाटांना जवळ करावं नव्या तर मागचे मुठी आवळतात मानेवर
पर्मेश्वरी लीला हरेक दारासमोर अुगवतात म्हातारे
त्यांच्या मेंदूवर कलम करतो पर्मेश्वर अविचारी विक्षिप्तपणा
म्हातारे मिळवतात पोरांच्या मुद्दलावर सुनांचं व्याज
चालतात बुद्धिबळातल्याहून अवघड चाली हरवतात सगळ्यांना

कसले क्षण कसले अंदाज कसले पाठपुरावे की आयुष्य निपचित
बंद केलं जातं अिस्पितळचातल्या खोलीत मागंपुढं काहीच नसतं
मागचे तवंग उठतात मेंदूत काही हलतं लकाकतं मिटून जातं
काही अुततं छातीत व्याकुळतं मन झाळोळून जातं किंवा जातं जळून
पुढची वादळं दिशाहीन पुन्हा सुन्न रिकामेपणा
भडकणारा सगळीकडून
नाळ पुरून टाकतात ते पाजवतात अस्तित्व अुत्सवसोहळ्यांनी
लादतात आयुष्य सगळी वळणं अनोळखी असतात सगळ्या वाटा
केवढ भयंकर मरता येत नाही तिथंच किंवा पुन्हा
परतण्यासाठी बंद झालेली असतात गर्भाशयाची दारं

तुकड्यातुकड्यातून आकारत सरकतं मोझेक आयुष्य
सगळे रंग सरमिसळतात किंवा सुटे होतात विटतात किंवा
फिटून जातात
कळत नाही काहीच गर्दीतून अेकटेपणातून तुटताही येत नाही
सगळंच स्विकारणं त्याचत्याच तालात गुणगुणत रहाणं कंटाळवाणं

सिगारच्या टोकावर जळते मोरॅलिटी फाटतं सगळीकडून नैतिक आभाळ
अेखाद्या पोरीची अलिप्त विचारपूस फरफटत ओढते अनैतिक जाळ्यात
वीतभर पाऊल टाकायला सापडत नाही सात्त्विक भुई कुठं
बदनाम मोहरांनी डागलेलं असतंच संवेदी कातडं

करता येत नाही काहीच गती संचारत नाही संगती टिकत नाही
सगळे दीपस्तंभ सरकतात प्रतिष्ठेच्या ओहोटीत किनारे पोरके वाटतात
सगळे मोजतात इज्जतइभ्रत चालतात फुटपट्ट्यांवर घालवतात आयुष्य
करतात नजरबंद मेलेलं पाखरू हाडांचे पिंजरे हिंदोळत राहतात

अेखादीच सावली खेळवते आयुष्य सुटत नाही होत नाही जिवंत
स्वतःच्या वेदना प्याव्या लागतात बंद कोषात वाढतं नर्गिसी फूल
रात्रींना आडोसा नसतो आणिक दिवसांचा भरवसा नसतं काहीच जवळ
आधी एक घर असतं आओीसारखं दूर राहचलेलं तेही मरुन जातं

●

२९

एकोणिसशे एक्काहत्तरच्या पैल्या पावसाची शप्पत
मी नीट वागणारय आत्तापासून अगदी व्यवस्थित पायजेय तसं
पण या पावसाचंच डोकं फिराय लागलय दुपारपास्नं
मला एकाएकी विलक्षण निर्वात वाटतय एकाएकी
भरुन येतय विलक्षण
मेंदूतले धागे तुटून जातायत मेंदूतल्या पेशी तरंगून
फुगून येतायत नाकातोंडातून कानातून डोळ्यातून
माझं लहान आतडं वाहून गेलं पाण्यात गटारभर कुठंतरी
स्नायूंवर ताबा नाहीय बसल्या जागेवर ताबा नाहीय
पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षाचं आताच एकाएकी काय व्हायला लागलय
आणिक मी असा मंद मंद हवेत कसा व्हाव्हत चाललोय
माझ्या अंगातले अणू विरळ होत चाललेयत आणिक
वैश्विक पसाऱ्यातला एक ढग अडकून पडलाय दुर्बिणीत

मी म्हणतोय नित्शे, निजिन्स्की, आर्तो, मंटो, मनमोहन
बोंबलून बोंबलून ओरडतोय सगळ्यांच्या नावानं पण
ध्वनींचं बर्फ होऊन रांगत रांगत जातय ध्रुवापर्यन्त तर
ऐकणारय कोण आणिक ओ देणारय कोण

मला असं का होतय
या आरश्यानं माझ्या डायमेन्शन्स खाऊन टाकल्या तरी
एक नार्सिसस्चं फूल बाहेर येऊन पाकळ्या माळून बसलय
आणिक माझ्या मनाचे तुकडे जुळवून मोझेक का चितारतय

पण असू देत. मी आता अपील करणारय विश्वंभराला, सूर्याला
बुधव्हॅटिकनमंगळशुक्रगुरुशनिहर्षलनेपच्यूनप्लूटोदी ग्रहांना
सर्व ग्रहांच्या उपजत नवाळ चंद्रचंद्रिकांना
राहुकेतूंना, नक्षत्रांना, स्वर्गंगेतल्या असंख्य सूर्यमंडळांना
की हे सर्वांनो
माझ्या पायांना आगंतुक मुळ्या फुटवून
जमिनीत रुतवून टाका भयंकर गच्च
– मला अजूनसुद्धा जगावं वाटतय इतक्या वर्षांनंतर !

३०

ऊर फुटून बहरू म्हणणाऱ्या एका वांझ झाडासाठी
मध्यरात्रीचा लचका तोडून दिला नकळत
आणि परतलो उध्वस्त आभाळातल्या पक्ष्यासारखा पिसाट
मागं वळून पाहचलं नाही कधी, आधीचे दिवस झाले
शेवाळलेल्या शिळा, मधल्या वर्षांचं गोठून बर्फ होऊन गेलं
रात्रींवर रेघोट्या ओढल्या, जागेपणी आगी लावल्या
न विचारता विचारात पडलो, घोळक्यात घुटमळून
एकट्यानच सडलो, नियतीनं फिरवलं आयुष्यपटावर
ज्यांनी फसवलं त्यांची फुलं होऊन बहकली वाऱ्यावर
ज्यांना फसवायचं नव्हतं कधीच त्यांचे झाले दगड
तरीही थांबलं नाही संक्रमण गाभ्यातल्या हलकल्लोळाचं

निमित्तांच्या दिशाबंद आयुष्यात झाडं पाखरं फुलं
दिवसरात्रींची अदलाबदल करीत येतीलच अधूनमधून
मेल्यावर एकटेपण आरपार जाईल पारवीय मनातून
आणि बहरेल वांझोटा दगड निस्संदर्भ समाधीवर.

●

दा. क्र. ९८८५४

247

वाचा प्रकाशन
निस्संदर्भ
चंद्रकान्त पाटील
किंमत पांच रुपये